# राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, विधानभवनासमोर, पुणे - ४११ ००१.
दुरध्वनी क्र. ०२०_२६०५०५८०/२६०५०६३२/३३ फॅक्स क्र. ०२०_२६०५०६३२

क्रमांक: अपील-२४८६/पुणे
दिनांक : २१.०३.२००९

प्रति,

डॉ.रविंद्र रुपगिरी गिरी
साई समर्थ हॉस्पिटल नारायणगाव,
ता.जुन्नर, जि.पुणे

विषय :- माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ मधील
कलम १९(३) द्वितीय अपिलाबाबत

महोदय,

आपण दि. १५.१०.२००८ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील अर्ज आयोगाकडे केला आहे.

सदर अर्जाचे अवलोकन केले असता गृहीतावर अधारीत कृतीची माहिती ठरत नाही तसेच प्रथम अपील योग्य त्या अपिलीय अधिकाऱ्याकडे केले नाही. त्यामुळे दाखल स्तरावर आपले अपील फेटाळण्यात येत आहे, असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपला,

( रा. म. गेंगजे )
कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

प्रत:

तहसीलदार, जुन्नर तहसील कार्यालय, जि.पुणे यांनी अर्जदारास मूळ माहिती अर्जाप्रमाणे देय माहिती त्वरीत देण्यात यावी व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

# राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, विधानभवनासमोर, पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी क्र. ०२०_२६०५०५८०/२६०५०६३२/३३ फॅक्स क्र. ०२०_२६०५०६३२

**क्रमांक: अपील-२६०७/पुणे**
दिनांक : २७/३/०८

प्रति,

श्री.माधव श्रीधर दामले
प्लॉट क्र.७८, स.नं.८१,
प्रज्ञानंद सोसायटी, शीतल हॉटेलसमोर,
वडगाव-मावळ, जि.पुणे

विषय :- माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ मधील
कलम १९(३) द्वितीय अपिलाबाबत

महोदय,

आपण दि. १०.११.२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील अर्ज आयोगाकडे केला आहे.

सदर अर्जाचे अवलोकन करता यापूर्वीच या विषयासंबंधित अपिलावर निर्णय घेण्यात आलेला आहे, तरी देखील आपणास पुन्हःमाहिती देण्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा तलाठी वडगाव मावळ, जि.पुणे यांना आदेश दिले आहेत. यास्तव आपण आयोगाकडे दाखल केलेले अपील फेटाळण्यात येत आहे. असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपला,

(स्वाक्षरी)

(रा. म. गेंगजे)
कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

प्रत:

कामगार तलाठी, वडगाव मावळ, जि. पुणे
२. अर्जदारास पुन्हः माहिती देण्यात यावी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्यांचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २७३५/ पुणे | श्री. गुलाब सिताराम जाधव ४७/३, भावेश सोसायटी, तावरे कॉलनी, हॉटेल नवरत्न पाठीमागे, पुणे- सातारा रोड, पुणे-९ | निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, राजगुरूनगर, ता.राजगुरूनगर, जि. पुणे | तहसीलदार, राजगुरूनगर, ता.राजगुरूनगर जि. पुणे | मौजे वाकी खु., ता. राजगुरूनगर येथील गट नं.१८३ च्या फेरफार बाबत माहिती | प्रस्तुत फेरफार संबंधात उप विभागीय अधिकारी, राजगुरूनगर यांच्याकडे फेरसुनावणीची कार्यवाही चालू आहे. त्यामुळे हे अपील निकाली काढण्या-बाबत अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | २७४५/ पुणे | श्री. अशोक बबनराव नागवडे रा.एच ५/१५, एस.टी.कॉलनी, पुणे सातारा रस्ता, पुणे-९ | आगार व्यवस्थापक (क) वरिष्ठ, राज्य परिवहन महामंडळ स्वारगेट आगार, वीर सावरकर नगर, पुणे-३७ | विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ स्वारगेट आगार, वीर सावरकर नगर, पुणे-३७ | सर्वश्री शेख, खंडागळे, सोनवणे या चालकांच्या बदलीबाबत व अन्य कर्मचाऱ्यांच्या बदलीबाबत एकूण सहा मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | २६८४ / पुणे | श्री. अशोक सुरेश मोरे मु.सणसवाडी, ता.शिरूर, जि.पुणे | सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,शिक्रापूर, ता.शिरूर,जि.पुणे | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.,शिक्रापूर, ता.शिरूर, जि.पुणे | वीजजोड घेण्यासाठीची प्रक्रिया, त्यासाठी लागणारा खर्च या कामाची जबाबदारी इत्यादी बाबत माहिती | अपीलकर्त्याने आवश्यक शुल्क भरलेले नाही. ते भरल्यानंतर माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. अपीलकर्त्याने माहिती हवी असल्यास शुल्क भरून घ्यावी. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २७६३ / पुणे | श्री. संतोष दत्तात्रय वारागडे, द्वारा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माळेगाव बु., ता.बारामती, जि. पुणे | सह संचालक,(अतां) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, घोले रोड, पुणे-५ | सहाय्यक संचालक, (तां) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, घोले रोड, पुणे-५ | सन २००३ ते २००८ या कालावधीतील कनिष्ठ लिपिकांच्या बदल्याबाबत एकूण ९ मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याने अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | २६४८ / पुणे | श्री. दत्तात्रय शंकर नाडकर्णी ०३, तळमजला, शोभा को.ऑप हौसिंग सोसायटी, छत्रपती शिवाजी मार्ग, अवधूत नगरजवळ, दहिसर (पूर्व), मुंबई -६८. | प्रशासकीय अधिकारी, छायाचित्र नोंदणी कार्यालय, ५, फायनान्स रोड, पुणे-४११ ००१ | अपिलीय प्राधिकारी, छायाचित्र नोंदणी कार्यालय, ५, फायनान्स रोड, पुणे-४११ ००१ | सह दुय्यम निबंधक, उ. बांद्रे यांच्या कार्यलयातील मूळ दस्त क्र.२४७७/८७ यादी क्र.२१/०४ ८ ऑक्टोबर २००४ ची सद्यस्थिती व अपिलीय प्राधिकारी यांचे नाव, पत्ता इ. माहिती | मूळ दस्तातील अ.क्र.३ व ४ येथील पाने सादर केल्यानंतर दस्त स्कॅन झाल्यावर परत पाठविण्यात येईल, असे प्रपत्रात जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील तक्त्यात नमूद केलेली अनु. क्र. १ ते ५ अपिले (क्र. २७३५, २७४५, २६८४, २७६३, २६४८ ) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. १६.३.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

# राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

(५८)

नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, विधानभवनासमोर, पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी क्र. ०२० २६०५०५८०/२६०५०६३२/३३ फॅक्स क्र. ०२० २६०५०६३२


क्रमांक: अपील-२७५६/पुणे
दिनांक : २१.०३.२००९

प्रति,

श्री.संजय यल्लप्पा चौधरी
फिलीफा बिल्डिंग, घर क्र.१३,
आझाद रोड, बी.एम.सी.के.इस्ट वॉर्डजवळ,
गुदेवली, अंधेरी (पूर्व), मुंबई ६९

विषय :- माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ मधील
कलम १९(३) द्वितीय अपिलाबाबत

महोदय,

आपण दि.११.०७.२००८ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील अर्ज आयोगाकडे प्राप्त झाला आहे.

सदर अर्जाचे अवलोकन करता आपली मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दिलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत बसत नाही, या कारणास्तव आपण आयोगाकडे दाखल केलेले अपील फेटाळण्यात येत आहे, असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत. जातीविषय वैधता प्रमाणपत्रातील त्रुटी असल्यास त्या दूर करण्याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग, पुणे यांनी नमूद केलेल्या प्रक्रियेचा आपण आवश्यक तर अवलंब करु शकता.

आपला,

(स्वाक्षरी)

( रा. म. गंगजे )
कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २७७५/ पुणे | श्री. यशवंत रावजी जगताप मु.पो.का-हाटी, ता.बारामती, जि. पुणे | ग्रामसेवक, ग्रामपंचायत का-हाटी, ता. बारामती, जि. पुणे | विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती, बारामती, जि. पुणे | मौजे का-हाटी येथील गायरान गट नं.५१७ मध्ये किती लोकांना त्यांच्या घराच्या आजूबाजूला किती बखळ जागा आहे व क्षेत्र किती, याबाबत माहिती, श्री. दादा श्रीरंग जगताप हे २०००-२००१ अगोदर कोठे राहत होते? | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | २७७६ / पुणे | श्री. यशवंत रावजी जगताप | ग्रामसेवक, ग्रामपंचायत का-हाटी, ता. बारामती, जि. पुणे | विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती, बारामती, जि. पुणे | मौजे का-हाटी येथील गायरान गट क्र.५१७ मध्ये किती लोकांना घरकुल/इंदिरा आवास योजनेतून घरकुल देण्यात आलेली आहेत, इत्यादी बाबत एकूण दोन मुद्दयांची माहिती | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | २६९७/ पुणे | श्री. बबन आप्पाजी बांगर कुकडी कॉलनी नारायणगांव, ता.जुन्नर, जि. पुणे | उप विभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग, नारायणगाव पोलीस स्टेशन, ता.जुन्नर, जि. पुणे | अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, चव्हाणनगर, पाषाण, पुणे | नारायणगाव पोलीस स्टेशन येथे दि.१५.१२.२००३ रोजीच्या एन. सी. क्र.७६८ बाबत माहिती, तसेच दि.२६.५.२००३, दि.७.७.२००३, दि.१०.७. २००३ व दि.२१.११.२००६ रोजी करण्यात आलेल्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती | आवश्यक माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | २६७६/ पुणे | श्री. प्रकाश दत्तात्रय मांगले दत्तप्रभा, ४२, विवेक सोसायटी, पद्मावती, पुणे-९ | सहाय्यक आगार व्यवस्थापक पुणे महानगर-परिवहन महामंडळ लि., पी.एम.टी. बिल्डिंग, शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे-३७ | सह आगार व्यवस्थापक पुणे महानगर परिवहन महामंडळ लि., पी.एम.टी. बिल्डिंग, शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे-३७ | पद्मावती बसस्थानकाच्या पिछाडीस असणाऱ्या रहिवाशांनी बसस्थानकाचे नूतनीकरणा संबंधात दि. १.१.२००८ रोजी दिलेल्या अर्जाला कोणतेही उत्तर दिलेले नाही. सदर अर्जाप्रमाणे नूतणीकरण केव्हा होणार याबाबत माहिती | अपीलकर्त्यांची बसस्थानकाच्या नूतनीकरणा साठीची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र दि१२.३.२००८ रोजीच्या अर्जास अनुसरून जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील तक्त्यात नमूद केलेली अनु.क्र. १ ते ४ अपिले (क्र. २७७५, २७७६, २६९७ व २६७६) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. १९.३.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

# राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, विधानभवनासमोर, पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी क्र. ०२० २६०५०१८०/२६०५०६३२/३३ फॅक्स क्र. ०२० २६०५०६३२


**क्रमांक: अपील-२७९०+२७९१/पुणे**
दिनांक : १८/०३/२००९

प्रति,

श्री.रूपचंद शिवराम चौधरी
२१२, ए वॉर्ड, दामोदर कॉलनी,
भांगरवाडी, लोणावळा,
ता.मावळ, जि.पुणे

विषय :- माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ मधील
कलम १९(३) द्वितीय अपिलाबाबत

महोदय,

आपण दि. १३.०१.२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील अर्ज आयोगाकडे केला आहे.

सदर अर्जाचे अवलोकन करता असे दिसून आले आहे की, संस्था व अपिलकर्ता यांच्यातील वादापोटी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज केले जात आहेत. अशा प्रकारे वैयक्तिक लाभासाठी सर्व यंत्रणांचा वेळ व श्रम वाया घालवणारी कृती आहे. याकारणास्तव आपण आयोगाकडे दाखल केलेले अपील फेटाळण्यात येत आहे. असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपला,

( रा. म. गेंगजे )
कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

प्रत:

१. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, पुणे
२. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांना माहितीस्तव सादर.

# राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, विधानभवनासमोर, पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी क्र. ०२० २६०५०५८०/२६०५०६३२/३३ फॅक्स क्र. ०२० २६०५०६३२


**क्रमांक: अपील-२८४२/पुणे**
दिनांक : २१.०३.२००९

प्रति,

सौ.सुजाता भगवान दुबे
गोदावरी स्मृती पहिला मजला,
फ्लॅट नं.२, केशवनगर, कासारवाडी,
पुणे -३४

विषय :- माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ मधील
कलम १९(३) द्वितीय अपिलाबाबत

महोदय,

आपण दि. ३१.०१.२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील अर्ज आयोगाकडे केला आहे.

सदर अर्जाचे अवलोकन करता वारसनोंद करण्याची आपली मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दिलेल्या माहितीच्या व्याख्येत बसत नाही, याकारणास्तव आपण आयोगाकडे दाखले केलेले अपील फेटाळण्यात येत आहे, असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपला,

( रा. म. गंगजे )
कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

प्रत:

ग्रामसेवक, ग्रामपंचायत, चाकण, ता.खेड,जि.पुणे यांनी नोंद न होण्याच्या कारणाबाबतची माहिती ८ दिवसात अपिलकर्त्यास द्यावी व त्याची प्रत आयोगास सादर करावी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. वसंत गोविंद खांडेकर
मु.डोंबाळवाडी, पो.शिंदेवाडी, — अपीलकर्ता
ता.माळशिरस, जि.सोलापूर-४१३ १०५

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा
उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.६.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. वसंत गोविंद खांडेकर
मु.डोंबाळवाडी, पो.शिंदेवाडी, ता.माळशिरस, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. प्रदीप स. मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री. तानाजी हरिबा घाडगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.५.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

## ८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती

मुख्याध्यापक पदोन्नतीच्या संदर्भात पदोन्नत समितीने ज्या कोर्ट केसमुळे पदे अपात्र ठरविली त्या केसची व ठरावाची प्रत, जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक मुल्यमापन समितीच्या ठरावाची प्रत, दक्षता रोध मंजूर आदेशाची प्रत व अनुषंगिक इतर मुद्दयांची माहिती

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी अर्ज प्राप्त न झाल्याचे कळविले व प्रथम अपील विहित नमुन्यात नसल्याच्या कारणावरुन दप्तरी दाखल करण्यात आले, त्यामुळे आपल्याला मुख्याध्यापक पदोन्नतीच्या संदर्भातील आवश्यक माहिती मिळाली नाही, म्हणून अपीलकर्ता श्री. वसंत गोविंद खांडेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. २८.३.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने अपील सुनावणीस घेण्यात आले.

श्री. खांडेकर यांनी मागितलेली माहिती सुमारे १८ वर्षांच्या अभिलेखामधील होती. (सन १९९० पासून) त्यांनी मागितलेली माहिती अन्य कार्यालयांकडून मागवून द्यावयाची होती, त्यामुळे विलंब झाला. तसेच अपीलकर्त्याची मूळ मागणी सेवानिवृत्तीवेतनविषयक असून ते नियमित होऊन मिळाल्यास तक्रार मागे घेण्यास संमती दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. तानाजी हरिबा घाडगे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले. पदोन्नत मुख्याध्यापकाचे वेतन मिळावे, अप्रशिक्षित वेतन निश्चिती (Untrained Pay Fixation) ऐवजी प्रशिक्षित (Trained) शिक्षकाची वेतनश्रेणी मिळावी यासाठी आपण माहिती मागत असून ती मूळ मागणी पूर्ण व्हावी, असे अपीलकर्ता श्री. खांडेकर यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या विषयावर अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची चर्चा झाली होती. त्यानुसार संबंधित विषयाच्या अनुषंगाने सन १९९० ते १९९५ या कालावधीतील कागदपत्रे दाखवून श्री. खांडेकर यांच्याशी चर्चा करून त्यांना कार्यवाहीबाबतची खात्री करून दिली, असे जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. तानाजी हरिबा घाडगे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. प्रदीप स.मोरे यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. पदोन्नत मुख्याध्यापकाचे वेतन मिळावे ही श्री.खांडेकर यांची मागणी मान्य केली असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र वेतन श्रेणीतील फरक एवढाच मतभेदाचा मुद्दा असल्याचे श्री. खांडेकर, श्री. घाडगे व श्री. मोरे यांच्या निवेदनातून स्पष्ट झाले. वेतनश्रेणीतील फरक ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.३.२००९

# राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, विधानभवनासमोर, पुणे - ४११ ००१.

[illegible] २६०५०५८०/२६०५०६३२/३३ [illegible] २६०५०६३२


क्रमांक: अपील- २००२/पुणे

दिनांक : २१.०३.२००९

प्रति,

सौ.योगी [illegible] फडके

क्षितीज, [illegible] क्र.७, सेक्टर बी,

वृंदावन को. ऑ.हौ.सो.,

पंचवटी, पाषाण, पुणे -८

विषय :- माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ मधील
कलम १९(३) द्वितीय अपिलाबाबत

महोदय,

आपण दि.०४.११.२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील अर्ज आयोगाकडे केला आहे.

सदर अर्जांचे अवलोकन केले असता आपण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीनुसार प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल करणे आवश्यक आहे. परंतु आपण तसे न करता आयोगाकडे दाखल केलेले अपील दाखल स्तरावर फेटाळण्यात येत आहे. असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपला,

( रा. म. गोंगजे )

कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी,

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

# राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, विधानभवनासमोर, पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी क्र. ०२०_२६०५०५८०/२६०५०६३२/३३ फॅक्स क्र. ०२०_२६०५०६३२

**क्रमांक: अपील- ३०७३/पुणे**
दिनांक : २१.०३.२००९

प्रति,

श्री.विलास हनुमंत बनसोडे
रा.शेळगाव, ता.इंदापूर, जि.पुणे

विषय :- माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ मधील
कलम १९(३) द्वितीय अपिलाबाबत

महोदय,

आपण दि.२०.०२.२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार द्वितीय अपील अर्ज आयोगाकडे केला आहे.

सदर अर्जाचे अवलोकन करता वालचंदनगर इंडस्ट्रिज लि. या खाजगी कंपनीस माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही. या कारणास्तव आपण आयोगाकडे दाखल केलेले अपील फेटाळण्यात येत आहे, असे आपणास कळविण्याचे मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे यांचे निर्देश आहेत.

आपला,

( रा. म. गंगजे )
कक्ष अधिकारी तथा माहिती अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सुभाष रामचंद्र पुट्टा
स.नं.१६, राघवस्मृती, गणेशनगर,
धायरी, पुणे-४११ ०४१

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह संचालक.अल्पबचत
व अवर सचिव, वित्त विभाग,
नवीन प्रशासकीय भवन, ८ वा मजला, मुंबई-३२

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
वित्त विभाग, अल्पबचत संचालनालय,
नवीन प्रशासकीय भवन, ८ वा मजला, मुंबई-३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुभाष रामचंद्र पुट्टा
स.नं.१६, राघवस्मृती, गणेशनगर, धायरी, पुणे-४११ ०४१

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.७.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.५, २२.७ व १४.९.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.७, १३.१, व ७.११.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सामान्य प्रशासनाचे पत्र क्र.ममाअ/प्रक्र.१२३/०५/२००५/१२७८/५ दि.१७.१०.२००५ व दि.७.१.२००६ नुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती, राज्यपालांचे सचिव कार्यालय, पत्र क्र. रास/माहितीचा अधिकार/२००६/प.४ दि. ४ मार्च २००६ नुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती तसेच महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचेकडे शासनाने प्रतिज्ञापत्रात दिलेल्या मुदयांची माहिती, सहसंचालक, अल्पबचत, मुंबई यांचे प्रतिज्ञापत्र जुलै २००४, अर्जदाराचे पुरवणी प्रतिज्ञापत्र ऑगस्ट २००३ व इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

पुणे अल्पबचत कार्यालयातील सन १९९४-९५ ते १९९७-९८ या कालावधीतील प्रोत्साहनपर अनुदानातील बनावट मागणी (बोगस क्लेम) व त्या अनुषंगाने आपल्या विरुध्द महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात शासनाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील मुदयांबाबतची कारणे अशी माहिती अपीलकर्ता श्री. सुभाष रामचंद्र पुट्टा यांनी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, वित्त विभाग, अल्पबचत संचालनालय, मुंबई यांच्याकडे मागितली होती. पोलिसांत गुन्हा नोंद असून तपास चालू असल्याच्या कारणावरून ती नाकारण्यात आली. त्याविरुध्द केलेल्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस आपण राज्य माहिती आयोगाकडे अपील केले असल्याचे श्री. पुट्टा यांनी सांगितले. त्यामुळे घ्माहिती आयोगाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल,ङ असे नमूद करून अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक, अल्पबचत व अवर सचिव, वित्त विभाग, मुंबई श्रीमती अमला वि. चेंदवणकर यांनी अपील निकाली काढले. आपल्यावर घोर अन्याय झाला असून उच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी आपल्याला माहिती मिळणे अत्यंत आवश्यक आहे, या कारणावरून श्री. पुटटा यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. २६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या घविशेष अपील निर्गत कार्यक्रमाङत या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत होऊ न शकल्यामुळे अपील सुनावणीस ठेवण्यात आले.

आपल्याला अर्थसंकल्पविषयक कामामुळे उपस्थित राहता येत नसल्याचे विनंतीपत्र अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक, अल्पबचत व अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई श्रीमती अमला वि.चेंदवणकर यांनी आयोगाला पाठविले होते.

बंडगार्डन पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या फिर्यादीची प्रत, प्रोत्साहनपर अनुदानाच्या नोंदीमध्ये /रकमेत खाडाखोड असल्याच्या पानांच्या प्रती इ. माहिती मिळाली नाही, असे श्री. पुट्टा यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. आपल्याला न मिळालेल्या माहितीबाबतचे सविस्तर निवेदन त्यांनी सादर केले.

श्री. पुट्टा यांचा अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अवये दि.७.७.२००५ रोजी केलेला आहे. हा कायदा निरसित झालेला असूनही अल्पबचत कार्यालयाने अर्ज व राज्य माहिती आयोगाने अपील विचारात घेतले.

अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक,अल्पबचत व अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई श्रीमती अमला वि.चेंदवणकर यांनी अर्जावरील व संबंधित प्रकरणाबाबतच्या श्री. पुट्टा यांच्या कार्यवाहीविषयी तपशीलवार निवेदन आयोगाला सादर केले आहे.

श्री. पुट्टा, अल्प बचत अधिकारी (बडतर्फ) यांनी १७६ बनावट मागण्या (बोगस क्लेम) स्वीकारुन सुमारे ६० लाखाचा अपहार झाल्यासंबंधी श्री. पुट्टा व इतर अधिकारी /कर्मचारी यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलिसांच्या आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाकडून त्याबाबत तपास चालू आहे. तसेच या प्रकरणातील सर्व संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी चालू आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ चे कलम ७ अन्वये माहिती नाकारण्यात आली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ८(१)(जे) पाहता श्री. पुट्टा यांना माहिती नाकारणे योग्य आहे. जिल्हा सरकारी वकिलांनीही तसाच कायदेशीर सल्ला दिला आहे, असे या निवेदनात - नमूद केले आहे. माहिती नाकारण्याचे हे कारण योग्य आहे.

गेल्या काही वर्षांपासून श्री.पुट्टा विविध पातळ्यांवर या संदर्भात अर्ज व तक्रारी करीत आले आहेत. मा.राज्यपालांकडेही याबाबत त्यांनी तक्रार अर्ज केले होते. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी श्री. पुट्टा यांचा अर्ज फेटाळलेला आहे, असे श्रीमती अमला वि. चेंदवणकर यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. न्यायाधिकरणात दाखल केलेल्या प्रतिज्ञा पत्रातील

काही भागाबाबत श्री. पुट्टा यांनी स्पष्टीकरणात्मक माहिती मागितली आहे, असे श्रीमती अमला वि. चेंदवणकर यांनी निवेदनात म्हटले असून अपीलकर्त्यांचा अर्ज व त्यासोबतचे निवेदन पाहता ते रास्त असल्याचे स्पष्ट होते. कागदपत्रांपेक्षा स्पष्टीकरण, अन्वायार्थ अशा प्रकारची मागणी श्री. पुट्टा यांनी प्रामुख्याने केली आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र या प्रकरणातील तपास पूर्ण होऊन दोषारोपपत्र सादर केले असल्यास त्यासोबतच्या कागदपत्रांसह सर्व प्रती श्री. पुट्टा यांना न्यायालयीन प्रक्रियेनुसार मिळतीलच, असे असले तरी माहितीच्या अधिकारातील त्यांच्या मागणीनुसार त्या त्यांना देण्यात याव्यात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अमान्य.

२. संबंधित प्रकरणात चौकशी/तपास पूर्ण झाला असेल व दोषारोपपत्र दाखल झाले असेल, तर दोषारोपपत्र व त्यासोबतची सर्व कागदपत्रे यांच्या प्रती अपीलकर्ता श्री. सुभाष रामचंद्र पुट्टा यांना जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी रजनी अ. बागडे यांनी उपलब्ध करुन द्याव्यात. याबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा अल्पबचत संचालनालय, मुंबई यांनी दि.१५.४.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा. याबाबतची संपूर्ण जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा उप सचिव, अल्पबचत संचालनालय, मंत्रालय, मुंबई श्रीमती अमला वि. चेंदवणकर यांची राहील.

पुणे
दि. ३०.३.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.लक्ष्मण कृष्णा चव्हाण
मु.मरडवाक, पो.धोंडेवाडी,
ता. खटाव, जि.सातारा

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
पोलीस अधीक्षक, सातारा

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उप अधीक्षक, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३९ / सातारा / २००८ |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१०.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.११.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.१.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.१.२००८ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांच्या पत्रानुसार केलेल्या चौकशीचा व कार्यवाहीचा अहवाल | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी या दोन्ही पातळ्यांवर आपल्याला अयोग्य व चुकीची माहिती दिल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री. लक्ष्मण कृष्णा चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

श्री. चव्हाण यांना योग्य व मुदतीत माहिती देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय, सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, सातारा यांनी दिलेल्या माहितीच्या प्रतीसह प्रपत्रात नमूद केले. दिलेल्या माहितीतील विधाने परस्परविरोधी असून माहिती दिशाभूल करणारी व असमाधानकारक आहे, असे श्री. चव्हाण यांनी नमूद केले. आयोगाने दि. १८.२.२००९ रोजी हे अपील सुनावणीस ठेवले. त्याच आठवड्यात मा. राष्ट्रपती, भारत सरकार, यांचा दौरा असल्यामुळे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी सुनावणीस उपस्थित राहू शकत नाहीत, याबाबतचे विनंतीपत्र पोलीस अधीक्षक, सातारा श्री. प्रकाश प्र.मुत्याळ यांनी आयोगाला सादर केले. आयोगाने ते मान्य केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मूळ अर्जासंदर्भात लेखी निवेदने पूर्वीच सादर केली होती.

मौजे मरडवाक, पो.धोंडेवाडी, ता. खटाव येथील समाईक रस्ता श्री. लक्ष्मण कृष्णा चव्हाण व इतर ६ यांनी अडविल्यामुळे ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी त्यांना अमानुष वागणूक दिली, या तक्रारीच्या संदर्भात राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांच्या पत्रानुसार केलेल्या चौकशीचा व कार्यवाहीचा अहवाल श्री. चव्हाण यांनी मागितला होता. या अहवालातील विधाने परस्परविरोधी आहेत. पोलिसांनी बेकायदेशीर हस्तक्षेप व अत्याचार केला असून दोषी ठरविलेल्या पोलिसांवर केलेल्या कारवाईचा उल्लेख माहितीत नाही, असे प्रतिपादन श्री. चव्हाण यांनी प्रपत्रात म्हटले आहे. त्याचाच त्यांनी आयोगापुढील सुनावणीत पुनरूच्चार केला. रस्त्याला आपली अनुमती असल्याचे पोलिसांनी जबरदस्तीने, धमकी देऊन लिहून घेतले, अशी त्यांची तक्रार आहे. असा प्रकार घडला नसल्याचे काही साक्षीदारांच्या जबाबाच्या प्रतींसह पोलीस अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. मात्र श्री. लक्ष्मण मार्तंड सूर्यवंशी यांच्या जबाबात तसा उल्लेख असतानाही पोलिसांनी खोटे विधान केले आहे, असा दावा श्री. चव्हाण यांनी केला. तसेच रस्ता खुला करून देण्याबाबत तहसीलदारांनी दि.२८.११.२००५ रोजी निर्णय दिला. मात्र तहसीलदारांच्या निर्णयानुसार रस्ता खुला न झाल्यामुळे ग्रामस्थांनी तक्रारी अर्ज दि. २५.७.२००५ रोजी दिला, असे पोलिसांनी म्हटले आहे. म्हणजेच तहसीलदारांच्या निर्णयाच्या जवळ जवळ चार महिने आधी तक्रार आल्याचे म्हटले आहे, यावरून कारवाईतील खोटेपणा लक्षात येतो, असे प्रतिपादन श्री. चव्हाण यांनी केले. पोलिसांनी अत्याचार केला, चौकशी योग्य प्रकारे झाली नाही, वगैरे

श्री. चव्हाण यांनी केलेल्या आरोपांचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत समावेश होत नाही.

श्री. चव्हाण यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. जबाबामधील विधाने योग्य की अयोग्य हा स्वतंत्र मुद्दा आहे, परंतु त्याची प्रत (साक्षीदारांचे जबाब) जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. चव्हाण यांना पुरविली आहे. श्री. लक्ष्मण मार्तंड सूर्यवंशी यांच्या जबाबामध्ये श्री. चव्हाण यांना मारहाण झाल्याचे त्यांनी सांगितल्याचे श्री. चव्हाण यांचे प्रतिपादन योग्य नाही. श्री. चव्हाण व श्री. सूर्यवंशी यांना पोलिसांनी बोलावून घेतले होते, असे त्या जबाबातून दिसते. मात्र धक्काबुक्की वगैरे झाल्याचे व जबरदस्तीने लिहून घेतल्याचे श्री. चव्हाण यांनी आपल्याला सांगितल्याचे श्री. सूर्यवंशी यांनी या जबाबात म्हटले आहे. स्वत: हा प्रकार पाहिल्याचे त्यांनी म्हटलेले नाही. इतर सर्व जबाबांमधील मजकूर एकाच प्रकारचा आहे, हे स्पष्टपणे लक्षात येते. रस्ता खुला करण्याच्या तहसीलदारांच्या निर्णयानंतरही रस्ता खुला न केला गेल्यामुळे ग्रामस्थांनी तक्रार केली या तपशिलाबाबत श्री. चव्हाण यांचे म्हणणे रास्त असल्याचे कागदपत्रांवरून दिसते. हा सर्व प्रशासकीय कार्यवाहीतील तपशिलाचा भाग आहे. मात्र त्यात माहितीची अचूकता राखली जाणे आवश्यक आहे. तहसीलदारांचा निर्णय व नागरिकांची तक्रार याबाबतच्या तारखांविषयक तपशिलाची व त्या अनुषंगाने मूळ नोंदींची शहानिशा जिल्हा पोलीस प्रमुख सातारा श्री. प्रकाश मुत्याळ यांनी करणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. मूळ कागदपत्रातून वर नमूद केलेल्या विसंगत तपशिलाबाबत चौकशी करून जिल्हा पोलीस अधीक्षक, सातारा श्री. प्रकाश मुत्याळ यांनी दि. २० मार्च २००९ पर्यंत अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. ६.३.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**